

डॉ. सुनील कराड



सुशांत महाडीक



डॉ. शैलेंद्र वाळे

# अशी रोखा मक्यावरील अमेरिकन लष्करी अळी

**सध्याच्या हवामान स्थितीमध्ये मका पिकावर अमेरिकन लष्करी अळीच्या (स्पोडोप्टेरा फ्रुजिपर्डा) प्रादुर्भावामुळे पिकाचे मोठे नुकसान होते. या किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.**

अमेरिकन लष्करी अळीची अंडी अवस्था २ ते ३ दिवसांची असते. अळी अवस्था साधारणपणे १४ ते २२ दिवसांची असते. अळी ६ वाढीच्या अवस्थांतून जाते.

- प्रथम अवस्था : अळी हिरव्या रंगाची असून डोके काळ्या रंगाचे असते. अवस्था ३ ते ४ दिवस असते. त्यानंतर डोक्याचा रंग गडद केसरी रंगाचा होतो.
- द्वितीय अवस्था : अळी तपकिरी रंगाची असते. ही अवस्था १.५ ते २ दिवसांची असते. या अवस्थेतील अळी खोडास छिद्र पाडून खोडात प्रवेश करते. तसेच पाने बाहेरून आतल्या बाजूस कुरतडून खाते.
- तिसरी अवस्था : अळी तपकिरी रंगाची असते. ही अवस्था १ ते २ दिवसांची असते. या अवस्थेतील अळी खोडास छिद्र पडून खोडात प्रवेश करते. तसेच पाने बाहेरून आतल्या बाजूस कुरतडून खाते.
- चौथी अवस्था : अळीचे डोके लालसर तपकिरी असते. पाठीवर दोन्ही बाजूंस सरळ रेषेत गडद ठिपके दिसून येतात. ही अवस्था १ ते २ दिवसांची असते. या अवस्थेपासून अळीचे खाण्याचे प्रमाण वाढत जाते.
- पाचवी अवस्था : ही खादाड अवस्था म्हणून ओळखली जाते, ती २ ते २.५ दिवसांची असते.
- सहावी अवस्था : या अवस्थेत अळीच्या अंगावरील गडद ठिपके तसेच डोक्यावर पांढऱ्या रंगाचा उलटा इंग्रजी 'Y' आकार स्पष्ट दिसतो. या अवस्थेत सुरुवातीला अळी पिकाचे मोठे नुकसान करते. ही अवस्था साधारणतः ३.५ ते ४ दिवसांची असते. त्यानंतर जमिनीत शिरून तेथेच कोषावस्थेत जाते.



अमेरिकन लष्करी अळी

## कोषावस्था

अळीचा कोष जमिनीत २ ते ८ सेंमी खोलीवर मातीच्या आवेष्टनात गुंडाळलेला आढळतो. कोष लालसर तपकिरी रंगाचे असून १४ ते १८ मिमी लांब असते. ही अवस्था ९ दिवसांपासून ३० दिवसांपर्यंत असू शकते.

## पतंग

पतंग करड्या रंगाचा असून मादी पतंग मक्याच्या पोंग्यात कोवळ्या पानांवर वरच्या बाजूने पुंजक्यात अंडी घालते. मादीचा जीवनकाळ साधारण १० दिवसांचा असतो. एक मादी सरासरी १००० ते २००० अंडी घालते.

## नुकसानीचा प्रकार

- अळीची सुरुवातीची अवस्था कोवळ्या पानांवर उपजीविका करतात. नंतर पोंग्यात छिद्र पाडून आतील भाग खाते. दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थेतील अळी काहीवेळा पानांच्या कडापासून आतील भागापर्यंत खात जाते. नंतरच्या अवस्था या प्रामुख्याने वाढीचा भाग खातात, त्यामुळे तुरा बाहेर येत नाही. काही वेळा कणसांवरील केस, कोवळी कणसे देखील खाते.

## किडीची वैशिष्ट्ये

- अळीच्या पाठीवर काळ्या ठिपक्यांचे पट्टे.
- डोक्यावर उलट्या इंग्रजी 'Y' अक्षराप्रमाणे असलेली खूण.

## प्रतिबंधात्मक उपाय

- प्रादुर्भावग्रस्त पीक अवशेष आणि यजमान वनस्पती नष्ट कराव्यात. तसेच सुप्तावस्थेत अळी असलेले खोड छाटावे.

## भौतिक नियंत्रण

- अंडीपुंज गोळा करून नष्ट करावेत.
- किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच पोंग्यामध्ये वाळू टाकावी. असे केल्याने अळीला वाढीच्या भागात खाण्यापासून परावृत्त करता येईल, शेंडा तुटणार नाही.

## जैविक नियंत्रण

- या किडीच्या अंड्यावर उपजीविका करणाऱ्या ट्रायकोग्रामा या परोपजीवी कीटकांची हेक्टरी ५०,००० अंडी दहा दिवसांच्या अंतराने तीन वेळा शेतात सोडावीत.
- प्रभावी नियंत्रणासाठी मेटारायझीअम (नोमुरिया) रिलाय (१.१५ टक्का डब्ल्यू.पी.) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून प्रादुर्भाव दिसून येताच १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.

## रासायनिक नियंत्रण

धान्य उत्पादनासाठी घेण्यात येणाऱ्या मक्यावरील अमेरिकन लष्करी अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी, **( प्रति १० लिटर पाणी )**

- स्पिनेटोराम (११.७ टक्के एस. सी.) ५ मिलि किंवा
- फ्ल्युबेन्डायमाईड (२० टक्के डब्ल्यू. जी.) ५ ग्रॅम किंवा
- इमामेक्टीन बेन्झोएट (२.२ टक्के) अधिक परमोथ्रीन (१५.३ टक्के ई. सी.) १५ मिलि किंवा
- इमामेक्टीन बेन्झोएट (१.५ टक्का) अधिक प्रोफेनोफॉस(३५ टक्के डब्ल्यू. डी. जी.) १५ मिलि
- वरील कीटकनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी.

**- डॉ. सुनील कराड** ९४२०३३००३६
(अखिल भारतीय समन्वित
मका संशोधन प्रकल्प, कोल्हापूर)